लोकमत

### दिलीप वळसे-पाटील : साखर महासंघाचे केंद्र शासनासमोर सादरीकरण

# साखरेचा राखीव साठा, निर्यात वाढवा

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : सध्याचे वर्ष हे साखर उद्योगातील सर्वाधिक आव्हानाचे वर्ष असून, यातून हा उद्योग टिकण्यासाठी साखरेचा राखीव साठा व निर्यात कोटा वाढविण्याची आग्रही मागणी साखर महासंघाचे अध्यक्ष आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी बुधवारी केंद्रातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली. यावेळी त्यांनी साखर उद्योगाचा सध्याचा आढावा घेत अडचणी मांडल्या.

वळसे-पाटील यांनी केंद्रीय अन्न सचिव रविकांत, साखर सहसचिव सुरेश कुमार वशिष्ठ तसेच पंतप्रधान कार्यालयातील साखरेचा विषय हाताळणारे सहसचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासमोर या अडचणींचे सादरीकरण केले. गतवर्षीच्या देशभरातील साखर हंगामाची जवळपास सांगता होत आली असून, विक्रमी ३३० लाख टन नव्या साखरेचे उत्पादन अपेक्षित आहे. १०४ लाख टन साखर शिल्लक असल्याने एकूण साखर ४३४ लाख टन उपलब्ध होणार आहे. त्यातून स्थानिक खप २६० लाख टन व निर्यात ३५ लाख टन वजा जाता १ ऑक्टोबर २०१९ रोजी सुरु होणाऱ्या नव्या हंगामाच्या सुरुवातीचा खुला साठा विक्रमी म्हणजेच १३९ लाख टन राहणार आहे. ही शिल्लक साखरच मोठे आव्हान असून, यामुळे कारखाने अडचणीत येण्याची शक्यता आहे.

साखर उद्योगाच्या स्थैर्यासाठी सध्याची मासिक विक्री कोटा पद्धत पुढेही चालू राहणे क्रमप्राप्त असल्याचे, तसेच इथेनॉल निर्मितीक्षमता वाढीसाठीची योजना किमान पुढील पाच वर्षे कायम राहावी, अशीही अपेक्षा यावेळी व्यक्त केली. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे यांनी चर्चेत भाग घेतला.

साखर उद्योगासमोरील ही आव्हाने व त्यावरील उपाय याबाबत एक दिवसाचे चर्चासत्र महासंघाच्या वतीने आयोजित करण्यात येणार असून, यावेळी केंद्र शासनातील संबंधित अधिकारी, देशातील साखर उद्योगाचे प्रमुख प्रतिनिधी व विषयतज्ज्ञ यांचा सहभाग राहणार असल्याचेही वळसे-पाटील यांनी सांगितले.

## मागण्या अशा

- सध्याच्या ३0 लाख टन राखीव साठा योजनेला मुदतवाढ देऊन, योजना ५0 लाख टनांपर्यंत वाढवावी, जेणेकरुन तितकी साखर स्थानिक विक्रीतून बाजूला गेल्याने साखर दरात समतोल होऊन शेतकऱ्यांची देणी भागविणे कारखान्यांना शक्य होईल.
- किमान ७0 ते ८0 लाख टन साखरेची देशाबाहेर निर्यात होणे गरजेचे आहे; त्यासाठी चालू वर्षाप्रमाणेच केंद्र शासनाची मदत मिळावी.
- साखरेचा किमान विक्रीदर निश्चित करण्याची पद्धत, उत्तर व दक्षिण विभागासाठी वेगळे दर असण्याची गरज व सध्याच्या रु. ३१00 प्रति क्विंटल विक्री दरात वाढ करावी.
- कारखान्यांसाठीच्या सॉफ्ट लोन योजनेची मुदत संपली आहे. तिला मुदतवाढ मिळावी. या मागणीवर अधिकाऱ्यांनी सकारात्मकता दर्शवून तसे आदेश देण्याचे मान्य केले आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Jun 01, 2019
Powered by: erelego.com